ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# 'भूमिकापालन प्रतिमान : एक मनोरंजक प्रतिमान'

**संजय बबन देवकर**

निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर ता.भोर, जि.पुणे

**सुवर्णा महेश पाटील**

जयवंतराव सावंत कॉलेज ऑफ एज्युकेशन, पुणे

## *Abstract*

**अध्यापन :**

विद्यार्थ्यांच्या कोणत्या शक्ती-प्रवृत्तींचा विकास, कोणत्या प्रकारचा बदल वर्तनात घडवून आणायचा आहे याची स्पष्ट कल्पना शिक्षकाला असली पाहिजे. म्हणजे विषयाच्या अध्यापनाची उद्दिष्टे कोणती हे त्याला निश्चितपणे माहित असले पाहिजे. उद्दिष्टांचे जर निश्चित ज्ञान असेल तर ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कोणकोणती माहिती, कोणकोणते अनुभव विद्यार्थ्यांना दयावे, कोणकोणत्या पद्धतींचा अवलंब करावा याचाही निश्चित स्वरूपात विचार करता येईल व अशा सुयोग्य पद्धतींचा अवलंब करून अध्यापन केले तरच त्या अध्यापनातून विद्यार्थ्यांचा अपेक्षित असा विकास करता येईल, त्यांच्या वागणूकीत इष्ट असे बदल घडून आणता येईल. याउलट उद्दिष्टांची स्पष्ट कल्पना नसली तर अध्यापनालाही कोणतीच निश्चित दिशा येणार नाही व अशा दिशाहीन अध्यापनातून निव्वळ विद्यार्थ्यांना माहिती देण्यापलीकडे दुसरा कोणताही उद्देश सफल होणार नाही.

परिवर्तन किंवा हा विकास प्रामुख्याने तीन पातळीवर घडून येत असतो. तो म्हणजे

१) ज्ञानात्मक पातळीवर - विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेले नवनवीन ज्ञान;

२) क्रियात्मक पातळीवर - त्यांच्यात निर्माण झालेली विविध प्रकारची कौशल्ये व विविध प्रकारच्या शक्ती.

३) भावात्मक पातळीवर - त्यांच्यात निर्माण झालेल्या निरनिराळया अभिवृत्ती व अभिरूची !

आधुनिक मूल्यमापन प्रक्रियेनुसारही उद्दिष्टांचे वर्गीकरण

१) ज्ञान व आकलन

२) उपयोजन

३) कौशल्य

४) रसग्रहण किंवा सौंदर्याभिरूची

५) अभिरूची व अभिवृत्ती

अशा पाच प्रकारांत केले जाते. त्यांच्याच जोडीला व्यक्तिमत्त्वाचे अन्य घटक या प्रकारचाही त्यात अंतर्भाव करतात.

शिक्षक हाच वर्गातील प्रमुख अधिकारी असतो. त्याच्याच मतानुसार सर्व प्रक्रियेचे संचालन होत असते; व त्यानंतर विद्यार्थ्यांना त्यात सहभागी होऊन प्रतिचार द्यावा लागतो. पण विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक अभिवृत्तीचा विकास करण्याच्या दृष्टीने वर्गात सामाजिक वातावरण निर्माण करण्यावर हल्ली बराच भर देण्यात येत आहे व त्यासाठी शिक्षककेंद्री अध्ययनाऐवजी सामुहिक पद्धतीचा पुरस्कार करण्यात येत आहे.'The Socialized Reciation is a democratic substitute for the ordinary autocratic situation in the school room.' असे उद्‌गार स्टॉर्महॉड नामक शिक्षणशास्त्रज्ञाने काढले आहेत.

सामुहिक अध्ययन पद्धतीचा वापर करण्याची प्रमुख तीन उद्दिष्टे म्हणजे - स्वतंत्रविचारशक्ती, विद्यार्थ्यांमध्ये परस्पर विचारविनिमय-चर्चा करण्यांची पात्रता, सहकार्य, परमतसहिष्णुता इत्यादी सामाजिक गुणांचा विकास करणे हे होत. अध्ययनाची बरीचशी जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकल्यामुळे त्यांच्यात स्वावलंबी वृत्ती व जबाबदारीची भावना यांचा विकास होतो. रूढ अध्ययन पद्धतीत सर्वच विद्यार्थ्यांना सहभागी होता येत नाही. काही विद्यार्थी न्यूनगंडामुळे किंवा संकोचामुळे फारसे बोलत नाहीत, आपली मते व्यक्त करू शकत नाहीत. परंतु अशा अनौपचारिक चर्चेमध्ये हेही विद्यार्थी भाग घेऊ शकतात. तसेच संचलनाचे कार्य विद्यार्थ्यांनाच करावे लागत असल्यामुळे त्यांच्यात नेतृत्त्वाचा विकास होतो; व सर्वांनाच सहभागी व्हावे लगाल्यामुळे आत्मविष्काराला भरपूर वाव मिळतो.

**भूमिकापालन प्रतिमान (Role playing Model)**

'भूमिका', 'नाटय' म्हणजे आकर्षकता, परिणामकारकता, रसोत्कटता, भूमिकापालन म्हणजे रसोत्कटतेची, भावनोत्कटतेची परिणामकारक अभिवृत्ती करणे व अनुभुती आणून देणे. नाटय हा प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा गुण आहे हे शिक्षणाचे ध्येय आहे.

**भूमिकापालनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे**

१) विद्यार्थ्यांत रसानुभूती किंवा रसास्वादाची पात्रता वाढविणे.

२) संवेदनक्षमता व सहानुभूतीचा विकास करणे.

३) कल्पकता, कलात्मकता, अभिवृत्ती व सृजनशीलतेचा विकास करणे.

४) नाटयगुणांचा विकास करणे - उदा.

अ) आकर्षक व परिणामकारक बोलण्याच्या सवयी

आ) सुयोग्य व सुडौल शारीरिक हालचालींवर

इ) आवाज व शारीरिक हालचालींवर प्रभुत्त्व

ई) भावाभिव्यक्तीचे सामर्थ्य

५) एकूण विद्यार्थ्यांमधून आकर्षक, सदभिरूचिसंपन्न, सहृदय व प्रभावी व्यक्तिमत्त्व निर्माण करणे.

६) त्यांना आत्मविष्काराची संधी देणे.

आपल्यला भूमिकाभिनय (भूमिका अभिनय) या एका नव्या पद्धतीचे स्वरूप समजून घ्यायचे आहे.

**अर्थ -**

ग्रॅव्स्, कार व फिश हे भूमिकाभिनयाची व्याख्या पुढील शब्दात करतात -

'Role playing is unprepared, unrehearsed dramatization.' अशाही शब्दांत करण्यात येते. नाटक व भूमिकाभिनय पद्धती यातील मुख्य व मुलभूत फरक म्हणजे या प्रकारात कोणतीही तयार संहिता नसते, तयार संवाद नसतात, तालिम नसते, पाठांतर नसते, मार्ग दर्शन नसते, काहीच पूर्वतयारी नसते. हे एकप्रकारचे समयस्फूर्त, उत्स्फूर्त नाटयीकरण असते. मग यात नेमके काय करावे लागत, 'Rloe playing is dramatic technique in which people attempt to portray a situation by putting themselves in the roles of the participant.' या वाचनातून भूमिकाभिनय पद्धतीचे स्वरूप लक्षात येऊ शकेल. एकंदरीत पूर्व नियोजनाशिवाय, पूर्वतयारीवाचून, कोणत्याही प्रकारच्या लिखित संहितेच्या, संवादाच्या तसेच तालमीच्या वा मार्गदर्शनाच्या अभावी एखादया प्रसंगाचा नाटयविष्कार करणे, त्यातील विविध भूमिकांचा स्विकार करून, त्यांच्याशी समरस होऊन कल्पनाशक्तीच्या आधारे समयस्फूर्त असे संवाद बोलणे, तदनुरूप अभिनय करणे व ती ती भूमिका वठविणे म्हणजे भूमिकाभिनय पद्धतीचा अवलंब करणे.

दु:ख संघर्ष हे टाळायचे असेल तर प्रत्येकाने दुसऱ्याच्या भूमिकेवरून विचार करणे, दुसऱ्याची बाजू समजून घेणे, दुसऱ्याच्या भावनांशी , सुखदु:खांशी, अडीअडचणींशी सहानुभूतीने समरस होणे हे अवश्यक असते. जीवनातील विविध प्रकारच्या भूमिका समर्थपणे वठविण्याचे कौशल्य, विशेषत: व्यक्तिसमजून घेण्याची, त्यांचे विचार- मते, भावना, समस्या सहानुभूतीपूर्वक जाणून घेण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी भूमिकाभिनय या पद्धतीचा फार चांगल्या प्रकारे उपयोग होतो. 'The purpose of role – playing is full understanding of oneself, of one's associates, of a Group or of a circumstance and to develop human relationship.'

बर्टन - "अध्यापन म्हणजे अध्ययनाला चालना देणे, मार्गदर्शन करणे, दिशा देणे आणि प्रोत्साहन देणे."

**अध्यापनाची प्रतिमाने (Models of Teaching):**

'Model' या शब्दाचा अर्थ आदर्श, प्रतिकृती, आराखडा किंवा पद्धती या अर्थाने ही संज्ञा वापरली जाते. परंतु येथे मात्र आराखडा पद्धती अथवा आकृतीबंध हा अर्थप्रेरीत आहे.

अध्यापनात विविध पद्धतींमध्ये शिक्षक - विद्यार्थी आंतरक्रिया, अपेक्षित वर्तन बदल, शास्त्रीय किंवा तात्त्विक बैठक स्पष्ट दिलेली नसते यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते बदल साधायचे स्पष्ट होत नाही. अध्यापन प्रतिमान मात्र या त्रुटी दूर करते.

शैक्षणिक मानसशास्त्र + सामाजिक मानसशास्त्र + अभ्यासक्रम निर्मिती प्रकल्प + उत्पादन क्षेत्रातील सल्लागार + प्रशिक्षणक्षेत्र + मानसोपचार = यातील संशोधन व त्यातून ज्ञानाचा विशिष्ट आकृतीबंध म्हणजेच अध्यापन प्रतिमान होय

अध्यापनाच्या प्रतिमानाचे प्रवर्तक हे अमेरिकेतील ब्रुसजॉईस व मार्शावील हे दोन शिक्षणतज्ज्ञ आहेत.

**व्याख्या :**

"कोणतीही व्यक्ती इतरांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी भावना एक वैशिष्ट्यपूर्ण आकृतीबंध वापरते यालाच त्या व्यक्तिची भूमिकापालन म्हणतात."

व्यक्तीचे स्वभावविशेष भूमिकांचेच वर्णन होय. इतर व्यक्ती, वस्तू, परिस्थिती यांच्याशी संबंध जोडण्याची प्रत्येकाची वैशिष्ट्यपूर्ण पद्धती असते. उदा. काहिंना इतरांच्या कृतीचा बोलण्याचा सतत संशय येत असतो, काहींना सर्वच विश्वासार्ह वाटतात.

यावरोबरच स्वत:बद्दलची एक संकल्पना असते. उदा. आपण हुशार आहोत, सतत आपले बरोबरच असते, आपण घावरट, मूर्ख आहोत, काहीजण सतत नरमाईचे धोरण घेतात. काही एकेकटे, स्वत:शीच रमतात, काही इतरांमध्ये रस घेतात.

आपल्या या भूमिका वर्षानुवर्ष झालेल्या परिणामाचा परिपाक असतो. जसे -

१) आपल्याला कोणत्या प्रकारच्या व्यक्ती भेटतात.

२) इतर व्यक्ती आपल्याशी कोणत्या प्रकारचे वर्तन करतात.

३) इतरांच्या आपल्याकडे पाहण्याच्या दृष्टीकोनाबद्दल आपला अवबोध महत्त्वाचा असतो.

४) आपली संस्कृती, परंपरा, रूढी इत्यादींचाही प्रभाव पडतो.

**भूमिकापालनातील अध्ययन प्रक्रिया (Learning process in Role Playing):**

स्वत:ला व इतरांना चांगल्याप्रकारे समजावून घेण्यासाठी, त्यामागील कारणांचे आकलन होण्यासाठी, सहानुभवामुळे (Impathy) विविध आंतरक्रिया, सामाजिक घटना यांचा अर्थ लावता येणे शक्य होते.

* भूमिकापालनात वास्तव भूमिकांचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या विविध भूमिकांचा अभिनय करण्याची संधी प्राप्त करून दिली जाते. याला अभिरूपता (Simulation) असते.

* विविध भूमिकांचा कृत्रिम व सुरक्षित वातावरणात वास्तव परिस्थितीसंबंधी सराव.

* मुले भूमिकांमध्ये शिरतात, खेळतात ते अनुकरण असते. भूमिका करण्यामागे हेतू नसतो.

* नाटयीकरणात अभिनय, संवाद, हावभाव, निश्चित असतात. हुबेहुब सादरीकरणावर भर असतो.

* भूमिकापालनात वरील सर्व गोष्टींचा अभाव असतो. भूमिका पालनात निव्वळ समस्या दिलेली असते, उत्स्फुर्तपणे भूमिका सादर होते. पूर्व तयारीविना पात्रांमध्ये आंतरक्रिया घडते. भूमिकेनंतर त्रयस्थपणे चर्चा, सादरीकरणाचे विश्लेषण करतात.

**यातून विविध गोष्टींच्या अध्ययनाची संधी मिळते :**

स्वत:च्या भावना समजावून घेणे, स्वत:वरोबर इतरांच्या वृत्ती, अववोध समजावून घेणे, समस्या निराकरण कौशल्यांचा विकास करणे, विषय भिन्न प्रकारे समजावून घेणे.

**या शैक्षणिक ध्येयामागील गृहितके खालील प्रकारची असतात :**

१) वास्तव जीवनातील समस्यायुक्त परिस्थितीशी साम्यदर्शक परिस्थिती निर्माण करता येते. त्यामुळे भूमिकापालन अनुभवजन्य व अध्ययनाला पोषक असते.

२) उत्स्फुर्त सादरीकरणात अभिनय करताना दडपलेल्या भावनांना मोकळी वाट मिळते. या भावनांमुळे वर्तनावर होणारा परिणाम अनुभवता येतो.

३) भावना, कल्पना जाणिवेच्या पातळीवर आणता येतात.

४) भूमिकांनंतर केले जाणारे विश्लेषण यायोगे अभिवृत्ती, मूल्ये, विश्वास यांची जाणीव होते. इतरांचे दृष्टीकोन समजतात.

५) 'माहिती पुरवणारा' या शिक्षकाच्या भूमिकेला छेद देत याउलट सहाध्यायींचे ऐकणे, त्यांच्याशी आंतरक्रिया घडते. अनुभूतींचा योजक ही भूमिका शिक्षक बजावतो.

आशय, शब्द, भावना, कृती, व्यक्तीचे वर्तन, निर्णय, त्यामागील कारणे, विचारप्रक्रिया जाणण्याचा प्रयत्न केला जातो. सुरूवातीस विद्यार्थी तयार होत नसतील तर मूकनाटय, मूकाभिनय यांचा सराव दयावा. भूमिकापालन मनोरंजनाचा केवळ भाग न मानता अभ्यासक्रमाचाच भाग मानणे आवश्यक आहे.

**प्रतिमानाचा पदबंध / पायऱ्या ( Syntare of the Model )**

१) गटाची पूर्वतयारी करणे ( Warm up the group )

२) भूमिकापालनासाठी सहभागींची निवड :

३) अभिनयाची पूर्वतयारी :

४) निरीक्षकांची पूर्वतयारी :

५) अभिनय करणे :

६) चर्चा आणि मूल्यमापन :

७) पुर्नअभिनय :

८) चर्चा व मूल्यमापन :

९) अनुभवांची देवाणघेवाण आणि सामान्यीकरण :